# **महर्षि चरक जयन्ति** १७ऑगस्ट २०२६

दि. १७ऑगस्ट २०२६

स्थळ- आयुर्वेद प्रसारक मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय

शिव, मुंबई२२

संस्कृत संहिता एवं सिध्दान्त या विभगाद्वारे आयोजित"संस्कृत क्लब्"अन्तर्गत श्रावण शुद्धपञ्चमी निमित्त म्हणजेच नागपंचमी दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी महर्षि चरक जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. आयुर्वेद क्षेत्रातील महान ऋषि आणि "चरक संहितेचे" निर्माते महर्षि चरक यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना महर्षि चरक यांच्या विचारसरणीशी जोडणे आणि आयुर्वेदाच्या शास्त्रिय व नैतिक मूल्यांचा प्रसार करणे हा होता .

**मुख्य कार्यक्रम व घडामोडी** –

अ) **धन्वंतरी पूजन –**

सकाळी ठीक १० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात स्थित धन्वंतरी मंदिरात कार्यक्रमाची सुरुवात झाली .

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्री रवि मोरे सर व संस्कृत संहिता विभागाचे विभाग प्रमुख डॉ श्री पुराडकर सर , डॉ श्री सातपुते सर , डॉ सौ मृदुला चौधरी मॅडम तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वर्ग तसेच सर्व पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्री मोरे सर यांच्या हस्ते श्री धन्वंतरी आणि महर्षि चरक यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.

सर्व विद्यार्थी व प्राध्यापक मिळून धन्वंतरी स्तवनाचे पठनक केले.



ब) **<u>चरक संहितेचे पूजन व ग्रंथ दिंडी –</u>**

महर्षि चरक आणि त्यांच्या "चरक संहिता" ग्रंथा बद्दल आदर व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयाच्या परीसारामध्ये भव्य दिंडी काढण्यात आली.





आयुर्वेदाचा मुख्य ग्रंथ असलेल्या चरक संहितेचे ग्रंथ पूजन करण्यात आले. ग्रंथ असलेली पालखी महाविद्यालयाच्या सर्व विभागातून फिरविण्यात आली.



क) **<u>संहिता पारायण</u>** –

या कार्यक्रमाचा मुख्य बौद्धिक व धार्मिक भाग म्हणजे "चरक संहिता" पारायण होय.

संस्कृत संहिता एवं सिद्धांत विभागातील सर्व शिक्षक व पदवी आणि पदव्युत्तर विदयार्थ्यांनी एकत्रित येऊन चरक संहितेतील सुत्रस्थानातील प्रथम अध्यायातील सूत्रांचे आणि श्लोकांचे सामूहिक उच्चारण व वाचन केले.



ड) **<u>विचारमंच व मार्गदर्शन</u>** –

परायणानंतर आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात डॉ श्री पुराडकर सरानी आपल्या भाषणात महर्षि चरक यांचे आयुर्वेदातील योगदान अधोरेखित केले.

त्यानंतर डॉ श्री सातपुते सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नव्हे तर उत्तम वैद्य बनण्यासाठी या ग्रंथाचा अंबहयास केला पाहिजे.



१७ऑगस्ट २०२६रोजी पार पडलेली महर्षि चरक जयंती केवळ एक औपचारिकता न राहता भावी आयुर्वेद वैद्यांसाठि प्रेरणादायी पर्व ठरली.

धन्वंतरी पूजन ,ग्रंथ दिंडी आणि संहिता पारायण यांसारख्या उपक्रमांमुळे उपस्थितामद्धे आयुर्वेदाचा अभिमान अधिक दृढ झाला.